# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3442/शि.वि./2014
दि. 25/11/2014

**प्रति,**

मुख्याध्यापक / मुख्याध्यपिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :–शिष्यवृत्ती परीक्षा 2014 च्या निकालपत्रकांचे वाटप तसेच शिष्यवृत्ती परीक्षा 2015 करीता ऑनलाईन आवेदन पत्र भरून प्रपत्र 'अ', चालान प्रत (msce copy) केंद्रावर त्वरीत जमा करण्याबाबत.**

**संदर्भ :– कार्यालयीन परीपत्रक क्र. 3329/शि.वि./2014 दि. 30.10.2014.**

उपरोक्त संदर्भांकिंत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पूणे यांच्या मार्फत इयत्ता 4 थी व 7 वी ची शिष्यवृत्ती परीक्षा मार्च 2014 मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचे शाळानिहाय निकालपत्रके कार्यालयास प्राप्त झालेली असून शाळानिहाय निकालपत्रकांचे वाटप खाली नमूद केंद्रावरून करण्यात येत आहे.

रविवार दि. 22 मार्च 2015 ला होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेकरीता ऑनलाईन आवेदन पत्र शाळेमार्फत भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली असून आवेदन पत्र नियमित शुल्कासह भरण्याची अंतिम तारीख 4 डिसेंबर 2014 आहे, दि. 5 डिसेंबर 2014 ते 19 डिसेंबर 2014 पर्यंत मागास, बिगर मागास विद्यार्थ्यांना प्रत्येकी रू. 50/– विलंब शुल्क लागेल करीता शाळांनी 4 डिसेंबर 2014 पूर्वीच आवेदन पत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी. सविस्तर माहितीकरीता www.mscepune.in या वेबसाइवर भेट द्यावी. बँकेत चालनाव्दारे रक्कम भरून चालन अपडेट करावी. यानंतरच आवेदन पत्र भलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र अ) ची प्रिंट आऊट निघेल. प्रपत्र 'अ' ची मुळ प्रतीवर विद्यार्थी स्वाक्षरी, पालक स्वाक्षरी, मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का उमटवून प्रपत्र 'अ' ची मुळ प्रत आणि 2 छायांकिंत प्रती तसेच चालन प्रत (msce copy) च्या दोन छायांकित प्रती रू. 50/– हाताळणी शुल्कासंह खाली नमूद केंद्रावर दि. 4 डिसेंबर 2014 पूर्वी जमा करावी. प्रपत्र 'अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे जसे पालकांचे उत्पन्न रू. 20,000/– कमी असल्यास प्रमाणपत्र, पालक भुमीहीन शेतमजूर असल्यास प्रमाणपत्र जोडावे. शिष्यवृत्ती परीक्षेकरीता अवेदन पत्र भरण्यात आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे 1 (Ident Size) फोटो शाळेत तयार ठेवावे.

- **ऑन लाईन आवेदन पत्र भरतांना शाळा संकेतांक, केंद्र संकेतांक 4 थी व 7 वी इयत्तानिहाय योग्य रितीने तपासून टाकावा.**
- **चालानची माहिती भरतांना एस.बी.आय. बँक हाच ऑपशन निवडून क्लीक करावा. शाळा व्यवस्थापन रक्कम भरेल असा ऑपशन निवडून क्लीक करू नका. अन्यथा चालान निघणार नाही**

| अ. क्र. | शाळा संकेतांक | केंद्राचे नाव | निकालपत्रक वाटपाची आणि प्रपत्र 'अ', चालानप्रत स्विकारण्याची वेळ |
|---|---|---|---|
| 1 | 7141 ............<br>7142 ............<br>7144 ............<br>या शाळा संकेतांक ने सुरू होणाऱ्या शाळा | दुर्गानगर उन्त समूह साधन केंद्र,मन.पा., नागपूर | सकाळी 11 ते दुपारी 2 पर्यंत |
| 2 | 7143 ............<br>7145 ............<br>या शाळा संकेतांक ने सुरू होणाऱ्या शाळा | बाळाभाऊ उन्त समूह साधन केंद्र,मन.पा., नागपूर | सकाळी 11 ते दुपारी 2 पर्यंत |

शिक्षणाधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc